महाराष्ट्र शासन

**इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**
**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2721/2024-25 दिनांक -09/10/2024

**-:योजनेचा तपशील:-**

**महाज्योती मार्फत "भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजातील युवक युवतींना स्पर्धा परीक्षेच्या शुल्कासाठी अर्थसहाय्य योजनेकरिता नोंदणी अर्ज"**

महाज्योती मार्फत महाराष्ट्र राज्यातील भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजातील युवक युवतींना महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) मार्फत चालु आर्थिक वर्षात 2024 - 25 मध्ये मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काची 50% परीक्षा शुल्क प्रदान करण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

## योजनेच्या लाभासाठी पात्रता:

1. मुलभुत पात्रता
2. शैक्षणिक पात्रता
3. आवश्यक कागदपत्रे
4. निवड प्रक्रिया
5. अनुदान वितरण

वरिल सर्व बाबी करिता आवश्यक अटी व शर्ती शासन निर्णय क्र. धसयो - 2024 /प्र.क्र.146/योजना-2 दि.19 ऑगस्ट 2024 नुसार राहील, सदर शासण निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

## अर्ज कसा करावा.

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "**भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजातील युवक युवतींना स्पर्धा परीक्षेच्या शुल्कासाठी अर्थसहाय्य योजनेकरिता नोंदणी अर्ज**" यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत वरील नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

**अटी व शर्ती** :

1. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
2. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
3. कोणत्याही माध्यमातुन व अंतिम निवड प्रक्रियेच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण किंवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास तो/ती विद्यार्थी कायदेशीर कारवाईस पात्र राहिल.
4. नमुद निकषांची पुर्तता न करणाऱ्या, अपूर्ण अर्ज सादर करणाऱ्या किंवा अर्जासोबत कागदपत्रे न सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अर्ज बाद करण्यात येईल. त्याकरीता विभाग किंवा कार्यालय जबाबदार राहणार नाही.
5. विद्यार्थ्यांचे बॅंक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.
6. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा :
   **0712-2870120/21.**

स्वा

(राजेश खवले)

**व्यवस्थापकीय संचालक,**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,

(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर.